24 OCT 2018

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# कव्वाली स्पर्धेत मुंबई, शिवाजी विद्यापीठाला विजेतपद

## व्दितीय, तृतीय क्रमांकही विभागून : जल्लोषी वातावरणात पारितोषिक वितरण समारंभ, रसिकांची उत्स्फूर्त दाद

प्रतिनिधी

कोल्हापूर

गेल्या दोन दिवसापासून शिवाजी विद्यापीठात रंगलेल्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठाने विजेतेपद पटकावले. विजेतेपद जाहीर झाल्यानंतर दोन्ही विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी एकमेकांना शुभेच्छा देत नृत्य करून आनंद साजरा केला. तसेच जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी सभागृह दणाणून गेले होते.

वि. स. खांडेकर सभागृहात झालेल्या पारितोषिक वितरण समारंभापूर्वी बनस्थळी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ या तीन संघांनी कव्वालीचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेतेपदाचे पारितोषिक स्वीकारताना यजमान शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत मान्यवर.

रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरुप होते.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठाने स्पर्धेचे आयोजन करून, कव्वालीचा वारसा पुढच्या पिढीला देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथम क्रमांक पटकावून विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. स्पर्धेच्या उद्घाटनानंतर दिवसभरात पाच स्पर्धकांनी कव्वालीचे सादरीकरण केले. मंगळवारी उर्वरीत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक (हरियाणा) आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या तीन संघांनी कव्वालीचे सादरीकरण केले. शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक, हरियाणा, लव्हली प्रोफेशनल युनिर्व्हसिटी, फगवाडा, पंजाब, बनस्थळी विद्यापीठ, राजस्थान या तिन्ही विद्यापीठांना व्दितीय क्रमांक विभागून देण्यात आला. तर डॉ. हरिसिंग गौर विश्वविद्यालय, सागर, मध्यप्रदेश, संत गाडगे बाबा आमरावती विद्यापीठ, आमरावती, व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा युनिर्व्हसिटी, नांदेड या तिन्ही विद्यापीठांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. रसिक प्रेक्षकांनी टाळ्या व शिट्ट्यांनी प्रतिसाद दिला. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी कव्वाली सादरीकरण केल्यानंतर उपस्थितांनी उत्स्फुर्तपणे प्रतिसाद दिला. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ज्येष्ठ गायक रियाझ खान व विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. भारती पाटील, डॉ. पी. डी. राऊत, अमित कुलकर्णी, डॉ. संजय जाधव, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राचार्य डॉ. एम. एल. होनगेकर उपस्थित होते.

### जुन्या आठवणींना उजाळा : अल्ताफ मुल्लाणी

प्रभाकर वर्तक यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या एकांकीका स्पर्धेतून मला प्रोत्साहन मिळाले. मुल्लाणी सध्या डॉ. हरिसिंग गौर विश्वविद्यालय, सागर, मध्यप्रदेश येथे संगीतशास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापक आहेत.

# कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठासह मुंबई अव्वल

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

कव्वालीसारख्या वेगळ्या गायन कलाप्रकारातून समतेचा व एकतेचा संदेश, गायक कलाकारांचे बहारदार सादरीकरण या बळावर शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग दुसऱ्या वर्षी राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. शिवाजी विद्यापीठासह मुंबई विद्यापीठाच्या कव्वाली संघाला प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला.

विद्यापीठाच्या प्रांगणात दोन दिवस रंगलेल्या तिसऱ्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवारी जल्लोषात झाला. विजेत्यांची नावे जाहीर होऊ लागताच आनंदोत्सवाला सुरुवात झाली. मुंबई व शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी निकाल घोषित झाल्यावर सभागृहात फेर धरला.

या स्पर्धेत विविध राज्यातील आठ विद्यापीठांच्या संघांनी सहभाग नोंदविला होता. व्दितीय आणि तृतीय क्रमांक प्रत्येकी तीन संघांना विभागून दिला. यामुळे सहभागी प्रत्येक स्पर्धक संघांनी आनंदोत्सव साजरा केला. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी विद्यापीठातील वि.स.खांडेकर भाषा भवन सभागृहात 'जश्न ए कव्वाली'चा कार्यक्रम रंगला. या स्पर्धेच्या निमित्ताने कोल्हापुरात कव्वालीचा रसिकवर्ग मोठा असल्याची प्रचिती आली. शहर व परिसरातील रसिकांनी दोन दिवस स्पर्धेला उपस्थिती दर्शवून आस्वाद लुटला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, ज्येष्ठ गायक रियाझ खान व विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही.गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ झाला. विजेत्या संघांना रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविले. दरम्यान, मंगळवारी स्पर्धेअंतर्गत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, महर्षी दयानंद विद्यापीठ रोहतक हरियाणा आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या संघांनी सादरीकरण केले. तर पारितोषिक वितरण सभारंभापूर्वी बनस्थळी विद्यापीठ राजस्थान, मुंबई विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठाच्या कव्वाली संघांनी कव्वालीचे विशेष सादरीकरण केले.





अर्जुन टाकळकर

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के व डॉ. आर.व्ही.गुरव यांच्या हस्ते कव्वाली स्पर्धेच्या विजेतेपदाचे पारितोषिक स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाचा संघ. दुसऱ्या छायाचित्रात प्रथम क्रमांक विभागून दिल्यानंतर शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सभागृहात नृत्याचा फेर धरला.

## अमरावती व नांदेड विद्यापीठाला तिसरा क्रमांक

## व्दितीय व तृतीय क्रमांक विभागून

स्पर्धेतील व्दितीय व तृतीय क्रमांक प्रत्येकी तीन विद्यापीठांना विभागून दिले. व्दितीय क्रमांक, महर्षी दयानंद विद्यापीठ रोहतक हरियाणा, लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ फगवाडा पंजाब आणि बनस्थळी विद्यापीठ राजस्थान यांना विभागून दिला. तृतीय क्रमांकाचे मानकरी डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठ सागर मध्यप्रदेश, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, आणि स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड हे ठरले.

## सभागृह हाउसफुल्ल

विद्यापीठात पहिल्यांदाच कव्वाली स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेच्या दोन्ही दिवसांच्या कालावधीत भाषा भवन सभागृह हाऊसफुल्ल झाले. विद्यापीठ प्रशासनाने स्पर्धेचे नियोजन नेटके केल्याची भावना सहभागी संघ व्यवस्थापनांनी व्यक्त केली.

24 OCT 2018

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# 'कव्वाली'वर शिवाजी विद्यापीठाची मोहोर

## राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धा : मुंबई विद्यापीठाचा संघ सहविजेता

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात गेल्या दोन दिवसांपासून उत्तरोत्तर रंगत गेलेल्या 'जश्न-ए-कव्वाली' अर्थात तिसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेत यजमान शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग दुसऱ्यांदा विजेतेपदावर आपले नाव कोरले, तर मुंबई विद्यापीठाच्या संघाला सहविजेतेपद जाहीर करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात मंगळवारी सायंकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ज्येष्ठ गायक रियाझ खान व विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे पारितोषिकांचे स्वरूप आहे.

स्पर्धेत द्वितीय क्रमांक तीन विद्यापीठांच्या संघांना विभागून देण्यात आला. यामध्ये महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक (हरियाणा), लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवाडा (पंजाब) आणि बनस्थळी विद्यापीठ, राजस्थान यांचा समावेश आहे. तृतीय क्रमांकही तीन विद्यापीठ संघांना विभागून देण्यात आला. यामध्ये डॉ. हरिसिंह गौर विद्यापीठ, सागर (मध्य प्रदेश), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा समावेश आहे. पारितोषिक वितरण समारंभापूर्वी बनस्थळी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ या तीन संघांनी उपस्थितांसाठी कव्वालीचे विशेष सादरीकरण केले. यावेळी भाषा भवन सभागृह रसिकांनी तुडुंब भरून गेले होते. प्रत्येक सादरीकरणाला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत होता.

तत्पूर्वी, सकाळी नऊ वाजल्यापासून स्पर्धेतील उर्वरित संघांचे सादरीकरण झाले. यामध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक (हरियाणा) आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या संघांनी सादरीकरण केले. या समारंभास शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, अधिष्ठाता व अन्य अधिकारी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते तिसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेतील विजेतेपदाचे पारितोषिक स्वीकारताना यजमान शिवाजी विद्यापीठाचा संघ. (छाया : एस. अली)

### कोल्हापुरात कव्वालीचाही प्रेक्षक

पोवाडा-लावणीचा परिसर असलेल्या कोल्हापुरात कव्वालीचाही चाहता वर्ग आहे, याची प्रचिती या स्पर्धेच्या निमित्ताने आली. शहर व परिसरातील अनेक रसिक प्रेक्षकांनी सलग दोन दिवस या स्पर्धेला उपस्थिती दर्शविली. काही प्रेक्षक तर सहकुटुंब उपस्थित राहिले. त्याचप्रमाणे कव्वालीसारखा वेगळा गायन कलाप्रकार तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनींना जवळून अनुभवता आला.

लोकमत

## राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा : मुंबई विद्यापीठ सहविजेता; 'दयानंद' द्वितीय

# शिवाजी विद्यापीठाला विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

### विशेष सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**बक्षीस वितरण कार्यक्रमापूर्वी बनस्थळी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठाच्या संघांनी कव्वालीचे विशेष सादरीकरण केले. या सादरीकरणाला विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि कोल्हापुरातील रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पोवाडा-लावणीचा परिसर असलेल्या कोल्हापुरात कव्वालीचा मोठा रसिकवर्ग असल्याची प्रचिती या स्पर्धेच्या निमित्ताने आली. ऊर्दू, हिंदी आदी बहुभाषिक कव्वालींचे सादरीकरण आणि संघांनी केलेली दमदार तयारी यावर्षीच्या स्पर्धेचे वैशिष्ट्ये ठरली.**



**कोल्हापूर :** उर्दूतील शेरो-शायरी, सूर-तालाच्या साथीने रंगलेल्या तिसऱ्या राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ कव्वाली स्पर्धेत यजमान शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग दुसऱ्यावर्षी विजेतेपद पटकाविले. मुंबई विद्यापीठाचा संघ सहविजेता ठरला. उत्साही वातावरणात शिवाजी विद्यापीठात मंगळवारी 'जश्न-ए-कव्वाली' या स्पर्धेचा समारोप झाला.

येथील विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात मंगळवारी सायंकाळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते विजेत्या संघांना चषक देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, परीक्षक रियाज खान प्रमुख उपस्थित होते. रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरुप होते. या स्पर्धेत द्वितीय क्रमांक रोहतकच्या (हरियाणा) महर्षी दयानंद विद्यापीठ, फगवाडाच्या (पंजाब) लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, राजस्थानच्या बनस्थळी विद्यापीठाला विभागून देण्यात आला. तृतीय क्रमांक सागर (मध्यप्रदेश) येथील डॉ. हरिसिंह गौर विद्यापीठ, अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठ आणि नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला विभागून देण्यात आला. बक्षीस वितरणानंतर विजेत्या संघांतील कलाकार आणि त्यांच्या समर्थकांनी सभागृहातच नृत्याचा फेर धरत जल्लोष केला. दरम्यान, या स्पर्धेत गेल्यावर्षी शिवाजी विद्यापीठाने प्रथम, तर मुंबई विद्यापीठाने द्वितीय क्रमांक मिळविला होता.

सकाळ

# कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ दुसऱ्यांदा विजयी



सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : तिसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेत यजमान शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग दुसऱ्यांदा स्पर्धेच्या विजेतेपदावर नाव कोरले. मुंबई विद्यापीठाच्या संघाला सहविजेतेपद जाहीर करण्यात आले. महर्षी दयानंद विद्यापीठ (रोहतक, हरियाना), लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ (फगवाडा, पंजाब) व बनस्थळी विद्यापीठाला (राजस्थान) विभागून द्वितीय क्रमांक देण्यात आला. विद्यापीठातर्फे वि. स. खांडेकर भाषा भवन येथे स्पर्धा झाली.

स्पर्धेत तृतीय क्रमांक तीन विद्यापीठ संघांना विभागून देण्यात आला. यात डॉ. हरिसिंह गौर विद्यापीठ (सागर, मध्य प्रदेश), संत गाडगेबाबा (अमरावती) व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड) यांचा समावेश राहिला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन संघांना गौरविले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, रियाझ खान व विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

## बक्षीस वितरणापूर्वी कव्वालीचे सादरीकरण

**बक्षीस वितरणापूर्वी बनस्थळी, मुंबई व शिवाजी विद्यापीठ संघांनी कव्वालीचे विशेष सादरीकरण केले. या वेळी भाषा भवन सभागृह रसिकांनी अक्षरशः तुडुंब भरून गेले होते. सादरीकरणाला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. शिवाजी विद्यापीठ संघाच्या सादरीकरणावेळी हा प्रतिसाद शिगेला पोचला. तत्पूर्वी, आज सकाळी नऊपासून स्पर्धेतील उर्वरित संघांचे सादरीकरण झाले. यात संत गाडगेबाबा, महर्षी दयानंद व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांचा समावेश होता.**

Kolhapur, Main
24/10/2018 Page No. 7

# युवा महोत्सवाचे वेध

कोल्हापूर टाइम्स टीम

एकीकडे अनेक अडथळ्यांवर मात करून युवा महोत्सवाची तारीख अखेर निश्चित झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये चैतन्याचे वातावरण असताना दुसरीकडे मात्र विद्यार्थ्यांच्या डोक्यावर परीक्षांचे वादळ घोंघावत आहे. पुर्वनियोजित तारखेस गृहीत धरून विद्यार्थ्यांनी युवा महोत्सवाची तयारी व अभ्यास यांचा मेळ घातला होता. पण सततच्या नवीन तारखांमुळे विद्यार्थ्यांना हा मेळ घालणे अवघड बनले आहे. तरीदेखील स्वतःमधील कलागुणांना वाव देण्यासाठी व स्वतःला सिद्ध करण्यासाठी हे विद्यार्थी नव्या जोमाने व हिरहिरीने या युवा महोत्सवात सहभागी होण्यास आतुरलेले आहेत हे ही तितकच खरं आहे.



मला अभिनयाची आणि गायनाची खूप आवड आहे. शालेय स्तरावर मी अनेक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे. गेली दोन वर्षे सलग विद्यापीठाच्या युवा महोत्सवात सहभागी होत आहे. माझ्या अंगी असणाऱ्या कलांना या मंच्यामुळे योग्य दिशा मिळाली आहे. विद्यार्थी कला जोपासणे आणि आत्मविश्वासाचा स्तर उंचावणे हा युवा महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे, असे मला वाटते. यावर्षी मी अभिनयाची निवड केली आहे. कला हे जीवन बदलण्याचं एक उत्तम साधन असतं. प्रत्येकाकडे एक ना एक कला असतेच, फक्त योग्य ती वेळी ओळखून तिचा सन्मान करण्याचं एक भव्य व्यासपीठ म्हणजेच युवा महोत्सव.

– गौरव पाटील
एम. ए. मास कम्युनिकेशन,शिवाजी विद्यापीठ

महाविद्यालयातील कलाकारांनी आतोनात मेहनत घेऊन युवा महोत्सवची तयारी केली. पण मध्यंतरी काही घडामोडी कळताच आशा नाहीशा झाल्या. कुलगुरूनी घेतलेल्या निर्णयाने युवा विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यापीठाने युवा कलाकारांचा विचार करून निर्णय घेतलेला आहे.त्यामुळे हा युवक महोत्सव जोमाने व त्याच उत्साहाने होईल.

– वैभव शिंत्रे,
राजाराम महाविद्यालय

युवा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहन मिळते. तसेच विद्यार्थ्यांमध्ये संघभावना जोपासली जाते. एकमेकांच्या गुणवैष्ट्यांबद्दल आदर निर्माण होतो. युवा महोत्सवाअंतर्गत सर्वोत्कृष्ठ कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांसाठी सहभागाची संधी मिळते. माझ्यासाठी हा सर्वोत्तम रंगमंच आहे असं मला वाटतं. मला अभिनयाची खूप आवड आहे. मी माझ्या गावी शालेय तसेच गावपातळीवर विविध नाटक आणि स्पर्धा केल्या आहेत. पण मला त्यातून काही फारस शिकता आलं नाही. मला माझे कलागुण सादर करायला एक रंगमंच हवा होता आणि हा मंच मला माझ्या महाविद्यालयात युवा महोत्सवाच्या स्वरुपात मिळाला आहे.

– रुणाली नांद्रेकर
विवेकानंद कॉलेज

युवा महोत्सवसाठी महाविद्यालयातून प्रथमच सहभागी झाले. युवा महोत्सव म्हणजे काहीही माहीत नव्हते. फक्त कला दाखवणे ही उद्देश होता. अभ्यास व प्रॅक्टिकल सगळं बाजूला ठेऊन आम्ही महोत्सवची सराव करत होतो पण मध्यंतरी काही घडामोडी झाल्या त्या निराशाजनक होत्या. मात्र, आत्ता युवा महोत्सवाची तारीख निश्चित झाल्याने तालमींना वेग आला आहे.

– सृष्टी पोवार, राजाराम महाविद्यालय

## सीसीआर

मी राजाराम महाविद्यालयाकडून यावर्षी युवा महोत्सवमध्ये सहभाग घेतला. मधल्या काळात युवा महोत्सव पुढे ढकलण्यात आला, पण नंतर तो स्थगितच झाला. त्यामुळे आमची खूप निराशा झाली होती. सगळ्यांनी केलेल्या मेहनतीवर पाणी पडल्यासारखं झालं होतं. युवा महोत्सवची आम्ही आशा सोडली होती. पण आता कुलगुरूनी घेतलेल्या निर्णयामुळे उत्साह निर्माण झाला. त्यामुळे युवा महोत्सव आणि परीक्षा दोन्हीचे नियोजन करता आले.

– मनस्वी कुंभार, राजाराम महाविद्यालय

24 OCT 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षणच्या माध्यमातून आता कौशल्य अभ्यासक्रम

## पारंपरिक अभ्यासक्रमाबरोबर सर्टिफिकेट कोर्स : कौशल्य अभ्यासक्रम शिकवताना प्रात्यक्षिकांचे मात्र मोठे आव्हान

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण अंतर्गत हजारो विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यामुळे आता दूरशिक्षणच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगार व स्थानिक उद्योगाला पूरक मनुष्यबळ मिळावे. यासाठी पारंपरिक शिक्षणाबरोबर कौशल्य विकास अभ्यासक्रम राबवण्याचा मानस विद्यापीठ प्रशासनाचा आहे. याबाबतचा प्रस्ताव अभ्यास मंडळासमोर मांडून मंजुरीनंतर अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रामध्ये ७६ कर्मचारी तर ३६ अधिकारी व कर्मचारी तसेच सांगली, सातारा येथे ३ समन्वयक कार्यरत आहेत. त्यामुळे स्टडी मटेरियल वितरण व्यवस्था, प्राथमिक सोयी-सुविधा, दूरशिक्षणसाठी लागणारे मनुष्यबळ, यासह अन्य सुविधा अतिशय उत्कृष्ट आहेत. विद्यार्थ्यांसाठी



व्हिडीओ कॉन्फरन्स, स्टडी मटेरियल, वाचनालय, कॉन्टॅक्ट सेशन, दर रविवारी अभ्यास वर्ग, सेट-नेटसंदर्भात चर्चासत्र व कार्यशाळा, मुलाखत तंत्र, प्लेसमेंट कॅम्प अशा अनेक सुविधा दिल्या जातात. त्यामुळेच दूरशिक्षण केंद्रांतर्गत जवळपास ३० हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यामुळेच प्रामुख्याने गृहीणी, सैनिक, व्यापारी, नोकरदार यांचा समावेश आहे. पश्चिम महाराष्ट्रात एकमेव शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्र सर्व सोयी-सुविधांनी युक्त आहे.

### विद्यार्थ्यांना व्यवसायासाठी प्रोत्साहन

दूरशिक्षण विभागांतर्गत सर्टिफिकेट कोर्सचा विद्यार्थ्यांना नोकरीच्या ठिकाणी फायदा होईल. स्थानिक कंपन्यांमध्ये रोजगार मिळेल. किंवा स्वतंत्रपणे व्यवसाय करता येणार आहे. तसेच संबंधित विषयामध्ये संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे.

**कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर (शिवाजी विद्यापीठ)**

विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातर्फे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालवले जातात. यामध्ये बी. ए., बी. कॉम., एम. ए., एम. कॉम., एम. बी. ए. हे अभ्यासक्रम शिकवले जातात. म्हणूनच युजीसीने १२ पैकी ८ विषयांना मान्यता दिली आहे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे अनेक विद्यार्थी दूरशिक्षणच्या माध्यमातूनच पदव्युत्तरचे शिक्षण घेतात. तसेच कळंबा जेलमध्ये शिक्षा भोगत असणारे आरोपीही दूरशिक्षणच्या माध्यमातून शिक्षण घेतात. पण स्पर्धेत टिकण्यासाठी कौशल्याची गरज असते. म्हणून विद्यार्थी हित लक्षात घेवून, कौशल्यावर आधारीत शिक्षण देण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. कौशल्य अभ्यासक्रमात ५० टक्के प्रात्यक्षिकांवर आधारीत अभ्यासक्रम असतो. त्यामुळे सक्षम यंत्रणा असली तरी प्रात्यक्षिके घेण्याचे मोठे आव्हान विद्यापीठाला पेलावे लागणार आहे.

**कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम**

इव्हेंट मॅनेजमेंट, पर्सनॅलिटी अँन्ड इंटरव्हू टेक्नीक स्कील, प्रेझेंटेशन स्किल, ट्रॅव्हल अँन्ड टुरिझम स्कील, ईगर्व्हनर स्किल, टेनर ट्रेनिंग स्कील इन्फोसेस, हॉस्पॅलिटी स्किल, फायनान्शीयल मॅनेजमेंट, इशु कल्चर डेव्हलपमेंट, ई-कॉमर्स स्किल, पी. जी. डीप्लोम इन इनव्हारमेंट सायन्स, हेल्थ अँन्ड डेव्हलपमें व्हॅल्यू एज्युकेशन अँन्ड इथेक्स या बरोबर लर्निंग मॅनेजमेंट हे अभ्यासक्रम शिकवले जाण आहेत. यातील काही अभ्यासक्रम एक वर्षाचे, तर काही अभ्यासक्रम सहा महिन्याचे आहेत.

### प्रात्यक्षिकांचे मोठे आव्हान

कौशल्य अभ्यासक्रमात ५० टक्के लेखी व ५० टक्के प्रात्यक्षिकावर आधारित अभ्यासक्रम असतो. त्यामुळे दूरशिक्षणच्या माध्यमातून कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू करीत असताना प्रात्यक्षिकासाठी विद्यार्थी उपस्थित राहणार का? हा मोठा प्रश्न आहे. तसेच प्रात्यक्षिकांचे नियोजन कसे करणार, यासाठी मनुष्यबळ कोठून आणणार यासह अनेक आव्हाने विद्यापीठासमोर आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 OCT 2018
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या आंतरराष्ट्रीय चंद्र महोत्सव

**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय चंद्र महोत्सव हा चंद्र विज्ञान आणि त्या संबंधीचे शोध याच्या स्मरणार्थ २०१० पासून दरवर्षी साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश केंद्राच्या वतीने उद्या (दि. २५) रोजी सायंकाळी ७ वाजता चंद्राचे निरीक्षण करण्यासाठी पदार्थ विज्ञान अधिविभागामध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजिन केले आहे. तरी खगोलप्रेमींनी चंद्र निरीक्षण व त्या विषयीच्या वैज्ञानिक माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी सहभाग घ्यावा, असे आवाहन अवकाश संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे. अपोलो ८ या चंद्र मोहिमेला ५० वर्ष पूर्ण होत असल्यामुळे या वर्षीच्या चंद्र महोत्सवास विशेष महत्व आहे. यावर्षी २० ते २७ ऑक्टोबरच्या दरम्यान साजरा करण्याचे आवाहन नासा प्लॅनेटरी सोसायटी व लुनार अॅन्ड प्लॅनेटरी इन्स्टिटयूट तर्फे करण्यात आले आहे. म्हणून विद्यापीठातील अवकाश केंद्राच्या वतीने गुरूवारी सायंकाळी ७ वाजता दुर्बिणीच्या माध्यमातून चंद्राच्या पृष्ठ भागातील विशेषत: विवरणाचे निरीक्षण करण्यात येणार आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठास सलग दुसऱ्यांदा विजेतेपद

## आंतरविद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा




कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते मंगळवारी तिसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेतील विजेतेपदाचे पारितोषिक स्वीकारताना यजमान शिवाजी विद्यापीठाचा संघ. (छाया : तय्यब अली)

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात गेल्या दोन दिवसांपासून बहारदार रंगलेल्या 'जश्न-ए-कव्वाली' या तिसऱ्या राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ कव्वाली स्पर्धेत यजमान शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग दुसऱ्यांदा स्पर्धेच्या विजेतेपदावर आपले नाव कोरले. प्रथम क्रमांक विभागून दिल्याने मुंबई विद्यापीठाच्या संघाला सहविजेतेपदाचा मान मिळाला.

शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात मंगळवारी सायंकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, रियाझ खान व विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचा पारितोषिक वितरण करण्यात आले. बक्षीस वितरणावेळी विजेत्या विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला.

भाषा भवन येथे बनस्थळी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ या तीन संघांनी उपस्थितांसाठी कव्वालीचे विशेष सादरीकरण केले. प्रत्येक सादरीकरणाला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिवाजी विद्यापीठ संघाच्या सादरीकरणावेळी तर विद्यार्थ्यांनी टाळ्या-शिट्ट्यांची दाद दिली.

स्पर्धेत द्वितीय क्रमांक तीन विद्यापीठांच्या संघांना विभागून देण्यात आला. यामध्ये महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक (हरियाणा), लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवाडा (पंजाब) आणि बनस्थळी विद्यापीठ, राजस्थान यांचा समावेश आहे.

तृतीय क्रमांकही तीन विद्यापीठ संघांना विभागून देण्यात आला. यामध्ये डॉ. हरिसिंह गौर विद्यापीठ, सागर (मध्य प्रदेश), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा समावेश आहे.